# ।। ॐ श्री साईराम।।

# प्रशांती संदेश – ८१

प्रशांती संदेशच्या ८१व्या भागात आपले स्वागत असो.

तुम्ही वेळ देत आहात याबद्दल आभारी आहे. आज सकाळसाठी विषय आहे, ''अरे माणसा, जागा हो!'' मी पुनरुच्चार करतो, ''अरे माणसा, जागा हो!''

या विषयावरील माझे काही विचार मला आपल्यासमोर मांडू द्या. आपण 'जागा हो' असं का म्हणावं? का? हे स्वत:च स्पष्ट सांगणार आहे, याचा अर्थ आपण गाढ झोपलेलो आहोत. आपण जागे नाही. म्हणून प्रत्येक बाबतीत जागं होणं हे जरुरीचं आहे. हे अध्यात्मिक परिणामाप्रमाणे घेतलेले आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की या सर्व निर्मितीमध्ये फक्त माणसालाच प्रश्न विचारण्याची क्षमता मिळालेली आहे. तो कोणत्याही बाबतीत प्रश्न विचारू शकतो. खरं तर, त्याने स्वत:लाच प्रश्न विचारावा की, ''मी कोण आहे? मी कोण आहे?''

आणि दुसरं म्हणजे, माणसाला एका पायरीवरून दुसऱ्या पायरीपर्यंत सुधारण्याची संधी दिलेली आहे. अगदी परमेश्वराच्या मस्तकापर्यंत पोचण्याची संधी आहे. म्हणजे देवत्व पावण्याची संधी आहे. त्याला तितकं बळ, सामर्थ्य दिलेलं आहे. म्हणून झोपेतून, गुंगीतून जागा हो आणि स्वत:ला प्रश्न विचार. 'मी कोण आहे?' हा प्रश्न 'तू देव आहेस' हे उत्तर मिळत नाही तोपर्यंत विचार, ह्या उत्तरापेक्षा कोणचंही कमी दर्जाचं उत्तर नको.

पूर्वी बाबा काय म्हणाले होते, ते मला तुम्हाला सांगायचे आहे. जेव्हा मूल जन्माला येतं, तेव्हा ते रडतं. काही काळानंतर ते मूल वाढत जातं, मोठं होत जातं, मुलगा होतो, युवक होतो, पिता आणि आजोबाही होतो. बाबा असं म्हणतात, की त्याने हे शरीर सोडताना रडू नये. तो जन्मताना रडतो पण मृत्यू पावताना त्याने हसत निरोप घ्यावा. त्याने जगाचा निरोप हसतच घ्यावा. माणसाचा जगण्याचा हा असा मार्ग आहे. जो माणूस जागृत असतो, तो असं वागेल. तो हसून जगाचा निरोप घेतो. जीवनात मिळालेल्या सर्व प्रकारच्या संधींचा त्याने आदर केला पाहिजे.

म्हणून मानवाची निर्मिती ही एक खास, विशेष निर्मिती आहे. तसेच सर्वसाधारणपणे कुणाही माणसाला आपण माणूस का झालो आहोत हे माहीत नसतं. त्याने काय करणं अपेक्षित आहे? काय हेतू, उद्दिष्ट आहे? ह्या प्रश्नांची उत्तरं मिळालेली नाहीत. तो असाच जन्मलेला आहे, त्याला देवत्व मिळवणं हे साध्य करायचं आहे. हेच ते कारण, हेतू आहे. ह्यातच आपल्या जीवनाचं उद्दीष्ट आहे. तेव्हाच आपण आपल्याला मानव असं म्हणून घेऊ शकू. जर पूर्ण स्वातंत्र्य मिळालं तर आपण विशिष्ट दिशेने स्वतंत्रपणे कार्य करू शकू आणि मनात येणाऱ्या प्रश्नांची उत्तरं देऊ शकू. तेव्हा काही झालं तरी, आपल्याला स्वत:ला सिद्ध करायचं आहे आणि आपण खरे कोण आहोत हे जाणून घ्यायचं आहे.

नंतर माझ्या मनात आलेली दुसरी गोष्ट अशी आहे, जे अशा रीतीनेही मांडता येईल. एक लिंबाचे रोपटे, मोठे लिंबाचे झाड होते, पुढे आयुष्यभर तसेच राहते. उदाहरण म्हणून पशुजात घ्या.. वाघ हा वाघाचं आयुष्य जगतो आणि जन्मभर वाघ म्हणूनच राहतो.

पण माणसाकडे, माणसाच्या बाबतीत खूप नाना गोष्टी असतात. शरीर मर्यादित असते, जीवनकाल मर्यादित असतो, पण त्याला इतर अनंत गोष्टींची देणगी मिळालेली आहे. त्याच्यामध्ये अमर्याद गोष्टी आहेत. हे अगदी स्पष्ट आहे कारण माणूस मोकळ्या मनाचा आहे. म्हणून त्याने आपल्या स्वत:मधील निरनिराळ्या, अनंतत्वाचा शोध घेण्याचा पाठपुरावा करायला हवा, आणि शरीराला मर्यादा आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. अशा प्रकारे चमत्कार असा आहे की मर्यादित, सीमित शरीरात अनंतत्त्व, देवत्व आहे.

आणि तुम्हीसुद्धा लक्षपूर्वक निरीक्षण केलं असेल, मला माहीत आहे की आपल्या सर्वांची निरीक्षणे सारखीच असतात, आपण कोणत्याही माणसाचे भविष्य सांगू शकणार नाही. तो पुढच्या क्षणी काय करेल ह्याचा अंदाज करू शकत नाही, तो पुढे कोण होणार आहे, त्याबद्दल सांगू शकत नाही. आता एका मोगऱ्याच्या फुलाचं उदाहरण घ्या– ते कायम मोगरा म्हणूनच राहणार एवढंच! इथे भविष्य किंवा अंदाज करण्याचा प्रश्नच येत नाही, ते कायम मोगऱ्याचं फूल म्हणूनच राहणार. डेलियाचं फूल– डेलिया. हे डेलियाच राहणार. इथे भविष्य करण्याचा प्रश्नच नाही. तुम्हाला वाट पाहावी लागणार नाही की त्याचे पुढे काय होणार आहे; त्याचे भविष्य काही नसते. पण माणसाच्या बाबतीत, तो पुढे कोण होणार ह्याचा अंदाज करू शकणार नाही. तो पुढे एखादा संत म्हणून उदयाला येणार किंवा एक पापी माणूस होणार आहे हे कोणाला ठाऊक आहे? आपण माणसाबद्दल पुढचा अंदाज करू शकत नाही. ते अशक्यच आहे कारण माणसाचे जीवन म्हणजे पूर्णपणे द्रव पदार्थाप्रमाणे सतत वाहणारे असते.

दुसऱ्या शब्दात माणूस ही एक प्रक्रिया आहे; एवढेच! म्हणून त्याचे भविष्य सांगता येत नाही. आणि त्याच्यामध्ये बदल घडवून आणण्याची शक्ती त्याच्याकडे आहे. तो आज जे असतो, त्यापेक्षा तो आणखी काही होऊ शकतो. हे सर्व का घडत असतं? फक्त एकच कारण आहे. एखाद्या अंधाऱ्या खोलीत, उदाहरणार्थ, जर तुम्ही सर्वांत किंमती, मौल्यवान रत्न ठेवले, रत्न किंवा हिरा, तर तुम्ही तो अंधारात शोधू शकणार नाही. पण तुम्ही दिवा लावलात की तो ताबडतोब शोधू शकाल. ते रत्न खोलीतच होते, पण ते खोलीतील अंधारामुळे तुमच्या लक्षात येणं अशक्य होतं. दिवा लावल्याबरोबर तुम्ही ते पाहू शकता.

अगदी त्याचप्रमाणे चैतन्य किंवा जाणीवा तुमच्या ठिकाणी असतेच. तेथे जाणीवेहून दुसरे काहीही नसतं. पण अज्ञानाच्या अंधारामुळे ते आपल्याला समजू शकलं नव्हतं. जर ते समजून घ्यायचं असेल तर त्याकरता आपल्याला ज्ञानाचा प्रकाश किंवा ज्ञानाची गरज असते. ते फक्त त्या ज्ञानप्रकाशामध्ये आहे, जो सर्व अंतरंग उजळू शकतो आणि तुम्हाला त्याचा अनुभव जाणवायला लागेल. हेच आपल्या जीवनाचं मुख्य कारण असतं, आपल्या आयुष्याचं ध्येय हेच आहे.

म्हणून जर आपलं अंतरंग प्रकाशित झालं नाही तर ते अज्ञानाच्या अंध:कारात पडून राहील. माणूस त्या जाणीवेच्या शोधात असतो, तो वाट बघतो आहे, तो ते चैतन्य किंवा अंतरंगातील जाणीव प्रकाशित करण्याकरता अनेक धर्मकार्ये करत असतो. इथेच माणसाचे वैभव व्यापलेले, पसरलेले असते. त्याच्या अंतरंगातील जाणीव हेच त्याचे वैभव असते.

पण त्याच वेळेस, दुसऱ्या अर्थाने हे त्याचं दुर्दैव असतं की ते तो शोधू शकत नाही, त्याचा अनुभव घेऊ शकत नाही. असा कितीतरी काळ जात असतो, तो वृद्ध होतो पण तो त्या अंतरंगातील जाणीवा शोधू शकत नाही. तो आपला वेळ ते शोधण्यामध्येच व्यतीत करतो.

भगवानांनी एकदा असं सांगितलं आहे:

तुम्ही जेव्हा दोन फांद्या एकमेकींवर घासता आणि तसेच एकमेकांवर घासत राहता, तुम्हाला अग्नी मिळतो.

जेव्हा तुम्ही दही घुसळता, तेव्हा लोणी मिळते आणि त्यातून तूपही मिळते.

त्याप्रमाणे या शरीरात पुन:पुन: शोध करणं, तपास करत राहणं, पुन्हा शोध करणं, ह्यामुळे आपल्याला आतील देवत्वाची जाणीव अनुभवता येईल का?

असे बाबा म्हणाले.

वृक्षामध्ये अग्नी आहे हे समजतं.

लाकूड एकमेकांवर घासून अग्नी निर्माण होऊ शकतो.

लोणी घुसळून घुसळून अखेरच्या टप्प्याला तूप मिळते.

चौकशी करून करून तुम्हाला सत्य समजते.

भगवान सत्यसाईबाबांनी सांगितलेलं सत्य आहे. म्हणून चौकशी करण्यामुळे आपल्याला आपला खरा स्वभाव किंवा वृत्ती शोधण्यास मदत होते. आणि मी हेही एक लक्षात आणून देतो. जीवनाचे कारण, जीवनाचे मूलतत्व माणसाला त्याच्या जन्मानंतरच्या काळातच स्पष्ट कळू लागतं. तो जन्मत: अज्ञानीच असतो. जीवनातील काही काळानंतर त्याला स्वत:ची ओळख कळू लागते.

दुसऱ्या शब्दात माणसाची सुरुवात अस्तित्वाने होते आणि त्यानंतर जीवनाचे मूलतत्त्व किंवा कारण शोधावे लागते. प्रथम बालक म्हणून अस्तित्व असते आणि तो वाढत जाईल तसतसा त्याला जीवनाचा अर्थ समजत जातो, पण माणूस हा प्राणी किंवा वृक्ष यांच्या जगापेक्षा निराळा असतो. प्राणी किंवा वृक्ष हे जन्मत:च जाणीवपूर्ण असतात आणि पुढे त्यांचं अस्तित्व जाणवते. कसे?

सोपे उदाहरण : तुम्ही बीज पेरता, बी रुजतं, आणि अंकुरतं. मग त्याचा मोठा वृक्ष होतो. त्याच्या नंतरच्या काळातील बाहेर येणारं रूप त्याच्या बीजात अप्रगत रूपाने पहिल्यापासूनच असतं आणि शेवटी ते वृक्षाच्या रूपाने बाहेर येतं. त्या बीजात सगळं काही आधीच सामावलेलं असतं आणि नंतर ते वृक्षाच्या रूपाने वाढतं. म्हणजे जाणीव आधी आणि अस्तित्व नंतर. माणसाचं आयुष्य याच्या उलट आहे. पुन्हा सांगायचं तर माणसाचं आयुष्य अस्तित्वाने सुरू होतं आणि तो नंतर त्याचा अर्थ शोधतो. जिथे पशु किंवा वृक्ष याच्या जगात, ते जाणिवेने आधी सुरूवात करतात आणि नंतर मग अस्तित्व समजतं. जसं मी झाडामधील नंतर वाढत जाणाऱ्या बीजाचं उदाहरण दिलं.

म्हणजे जीवनात हे सगळं काही असतं. आपल्यातल्या पुष्कळांना जीवनाचा अर्थ कळण्याची संधी मिळते आणि माणसाला स्वत:ची ओळख निर्माण करावी लागते. तो यशस्वी होतो किंवा नाही, तो तितक्या ताकदीचा आहे किंवा नाही हा प्रश्न वेगळा. त्यांनी ओळख निर्माण करावी, त्यानं त्यासाठी खूप कष्ट घेतले पाहिजेत. होय! त्याला पुन:पुन्हा तयारी करावी लागेल, शोध घ्यावा लागेल, तपास करावा लागेल, कसून पाहणी करावी लागेल. तुम्ही त्याला काहीही म्हणा!

पण कुठलाही पशु जीवनात यशस्वी होतो. वाघ हा वाघ म्हणून, सिंह हा सिंह म्हणून यशस्वी होतो. पोपट किंवा मोरही खूप यशस्वी होतात, तसेच वृक्षही, कारण ते जन्मभर तसेच जगत असतात. ते एकाच परिस्थितीत राहू शकतात आणि त्यांच्याकडून जी अपेक्षा असते तसेच ते राहतात. पण माणूस हा एकाच स्थितीत राहू शकत नाही. त्याच्याकडून त्याच्यातील असलेले देवत्व त्याला उलगडलेले नसते. म्हणजे माणूस जे होऊ शकतो, तसा होत नाही. प्राणी आणि वृक्ष होतात तसे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर इतर प्राणी, वृक्षांप्रमाणे माणूस हा पूर्वतयारीनिशी जन्माला, अस्तित्वात आलेला नसतो.

म्हणून हे स्पष्ट आहे की, जर आपण आपल्या जीवनाच्या ध्येयाकरता प्रयत्न केले नाहीत, तर आपण केवळ अस्तित्वासाठी जगतो. जीवनातील महत्त्व न कळताच आपण जगतो. मग प्रश्न असा निर्माण होतो की आपण असेच जिवंत राहिलो तर काय उपयोग? काय होणार आहे? तर आपण आपला आत्माच गमावतो आणि जीवनातील आनंद, समाधान मिळणार नाही. आपण नेहमी दु:ख, मनोवेदना, तणाव आणि चिंतेत राहतो कारण आपल्या जीवनाचे महत्त्व जाणून घेण्याचा आपण प्रयत्नच केलेला नसतो आणि ते खूप मनोरंजक आहे. आपण स्वीकारलेली धार्मिक कार्ये, तसेच जे धार्मिक संस्कार आपण आचरतो, ते आपल्याला जीवनाच्या मूळ तत्वाप्रत नेऊ शकणार नाहीत.

स्वामी काय म्हणतात त्याकडे लक्ष द्या:

जर आपण नागाला मुंग्यांच्या वारूळावर घासत बसलो तर तो मरेल का? नाही.

जर आपण आपल्या शरीराला भुकेने किंवा रात्रीच्या जागरणाने शिक्षा केली.

जर तुम्ही जलप्राशन किंवा अन्नग्रहण केलं नाही.

शरीराला शिक्षा देऊन तुम्ही ज्ञानी किंवा शहाणा माणूस व्हाल का?

जगातील सर्व सुखसोयी, त्या मिळविण्याकरता लागणाऱ्या सुखसोयी मिळाल्या तर त्या इच्छा पुऱ्या होतील का? नाही.

जर माणसाने स्वत:लाच ओळखले नाही, जर त्याने स्वत:चीच माहिती करून घेतली नाही, तर त्याला स्वत:चेच सत्यरूप कळेल का? सत्याची ओळख पटेल का? अशक्य! अशक्य.

ह्या संदर्भात भगवान असं म्हणाले. म्हणून आपल्या आयुष्याचा अर्थ समजून घेण्यासाठीच आपलं जीवन आहे. मूलतत्त्व जाणून घेणं हेच जीवनाचे कार्यकारण आहे.

ह्यासाठी कशाची जरुरी आहे? आपण ह्या अंधारातून बाहेर पडलं पाहिजे. तमसो मा ज्योतिर्गमय। नियमित जीवन जगण्याचा आणि स्वयंप्रकाशित जीवनाचा अनुभव घेण्याकरता आपल्यातील प्रत्येकात देवत्वाची अंतर्ज्योत असते हे माहीत असलं पाहिजे. पण दुर्दैवाने ती आपल्यातच असते हे माहीत नसतं हेच खरं! आपण जगभर भटकत असतो पण अजून आपल्या स्वत:मध्ये शोध घेत नाही. आपण ह्या सत्यापासून कायम अनोळखीच राहिलो आहोत.

म्हणून आपलं अस्तित्व हे मूलभूत तत्त्व होऊन राहिलं पाहिजे. त्यातच आपल्या जीवनाचं सौंदर्य आहे. माणसाने ते स्वत:च घडवलं पाहिजे. माणसाला परमेश्वराच्या योजलेल्या या कार्यात सहभागी होण्याचा अधिकार आहे. इतर जीवमात्राला तसे करता येत नाही कारण त्यांना त्याच्यापुरतेच निर्माण केलेले आहे. ते फक्त त्यांच्यापुरतेच जगतात. त्यांना दुसऱ्या कोणत्याही मार्गाने जाण्याची परवानगी नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे इतर पशु, पक्षी, वृक्ष हे सामान्य जीवन जगतात. नैसर्गिक जीवन जगतात. त्यांच्यात आपोआपच संक्रमण होत असते, त्याला कोणताही खास प्रयत्न करावा लागत नाही. झाडं, फुलं व त्यातून बीज आलेल्या फळांमध्ये रुपांतर होणं हे प्रयत्नाशिवाय नैसर्गिक रीतीने, यंत्रवत् होत असते.

पण माणसाला मात्र जसे पाहिजे तसे तो करू शकतो, होऊ शकतो. तो रंगारी होऊ शकतो. व्यवस्थापक होऊ शकतो. अभियंता, अध्यापक, डॉक्टर किंवा सुरेल गायक किंवा उत्तम चित्रकारही होऊ शकतो. तो कोण होऊ शकतो, काय होणार हे कोणालाही माहीत नसतं. दुसऱ्या शब्दात, सत्य प्रत्यक्ष दिसेपर्यंत, काही काळ जाईपर्यंत सर्व काही गोंधळात टाकणारे असते. जीवन हे एका नदीसारखं आहे. नदी सतत प्रवाही असते आणि सतत बदलत जाणारी असते. तसंच जीवनही प्रवाही, सतत बदलत जाणारं असतं आणि इथेच माणसाची प्रतिष्ठा, मोठेपणा असतो आणि तोच फक्त एक आहे जो नवी निर्मिती करू शकतो. ही निर्माणक्षमता माणसामध्ये असते, इतर कोणत्याही प्राणीमात्रात नसते. नाहीतर मग निर्मिती न करणाऱ्या पशुचे जीवन व्यतीत करणारे आपण झालो असतो.

पण सध्या आपण अडचणीत सापडलेले, गोंधळात पडलेल्या मन:स्थितीत आहोत. का? कारण आपण गंभीरपणे कृती करत नाही किंवा अध्यात्माचा शोध घेत नाही कारण आपल्याला अशी शंका असते की आपण यशस्वी होऊ किंवा नाही? आपण एखादी गोष्ट मिळवू शकू किंवा नाही अशी शंकेची जाणीव, भीती, आपल्यात असते. आपण स्वत:ची चौकशी करणारे कोणीही नाही आहोत अशी कमीपणाची भावना मनात बाळगतो. आपण अडखळतो. का? तर आपल्याला परिणामाची खात्री नसते आणि आपल्या ताकदीबद्दल खात्री नसते. तसंच आपल्या मर्यादेपलीकडे जाऊ शकू किंवा नाही, उंची गाठू शकू की नाही याबद्दल मनात शंका असते. अशा या गोष्टी सतत त्रास देणाऱ्या, छळणाऱ्या गोष्टी असतात.

तेव्हा आपल्याला पहिली गोष्ट करायची असेल तर भूतकाळ विसरला पाहिजे. आपण भूतकाळ सोडून

देऊ या. भूतकाळ काय होता ते माहीत आहे. भविष्यासाठी त्याला मागे टाकू या. त्याचा त्याग करू या. आपल्याला माहीत असलेल्या भूतकाळाचा माहीत नसणाऱ्या भविष्यासाठी त्याग करू या. त्याग करून विसरा.

ह्या संदर्भात गुरूची आपल्याला खूपच मदत होईल कारण तो त्या गोष्टी पार करून गेलेला आहे. तो त्याच्या जीवनाच्या केंद्रस्थानी प्रगट झाला आहे. त्याला जीवनाचा अर्थ पूर्णपणे समजलेला आहे. आणि एक गुरू असल्याने तो आपले जीवन उच्च पातळीवर नेण्यासाठी मार्गदर्शन करतो. तो आपल्याला खूप युक्तीच्या गोष्टी सुचवतो, वेगवेगळी तंत्रे, कौशल्ये शिकवतो. आपले जीवन उच्च पातळीवर नेण्यासाठी, आपल्या जीवनाशी संपर्क साधण्याचे आणि शिकवणूक देण्याचे त्याचे स्वत:चे असे मार्ग व साधने असतात. ज्या सर्व गोष्टी तो आपल्याला बहाल करतो किंवा देतो, ते फक्त मार्ग आणि साधने असतात, अशा पद्धती असतात की ज्यामुळे आपल्याला स्वत:चे खरे ज्ञान होईल. मार्ग, शक्ती, संपत्ती आणि ओळख अशा परिणामकारक गोष्टी देण्याची परमेश्वराची साधने आहेत.

म्हणून ज्या गुरूने आपल्या आयुष्याचे मर्म समजण्याकरता मदत केली त्याची भूमिका कधीही विसरू शकणार नाही. जीवनाचा अर्थ आपल्याला आज किंवा उद्या समजलाच पाहिले. आणि मग माणसाला हे शिकण्याकरता, शोधण्याकरता आणि स्वत्व जाणून घेण्याकरता या जगात सोडलेले असते. हीच यातील सुंदरता आहे आणि ही स्वत:च्या जाणीवेची ओळख होण्याची कार्यपद्धत आहे. ही प्रणाली सतत चालूच असते, त्यालाच स्व-निर्मिती असे म्हणतात. त्याला स्वत:लाच निर्मिती करायची असते. त्याला कोणी सांगत नाही, ही जाणीव आहे, हे त्याला कोणीही समजावून देत नसते.

म्हणून सर्व भूतकाळ विसरून, नाकारून, आत्मोन्नती किंवा स्वत:च्या प्रगतीची प्रक्रिया सतत चालू ठेवली पाहिजे. तेव्हाच आपलं जीवन उन्नत होईल, आपलं आयुष्य हे पुनरावृत्ती व्हायला नको. प्रत्येकाने मरण पत्करावे ते परत मरण्यासाठी नको, एवढेच! जसं रोजच्या वर्तमानपत्रातील बातमी एकदा वाचून झाल्यावर ती परत वाचली जात नाही. मुळीच नाही.

म्हणून एकदा जगलेलं आयुष्य, स्वत:ची खरी ओळख झाल्यावर परत जगू नये. याचा अर्थ असा की माणसाने पुन्हा 'जन्माला यावे' पण ह्या 'पुन्हा जन्माला यावे' याचा अर्थ काय? एक नवीन व्यक्ती, जिने स्वत:ला ओळखलं असेल.

काही वेळा आपण इतके निराश होतो की आपल्यापेक्षा जनावरे बरी असे वाटू लागते.

माणसापेक्षा जनावरे बरी वाटतात.

सर्व ज्ञान आणि शहाणपण मिळवून शेवटी त्याचा उपयोग काय?

मानवाने सर्व मानवी गुण विसरले आहेत, मानवी मूल्ये नाहीशी झाली आहेत, तो फक्त एखाद्या निर्जीव वस्तूप्रमाणे जगतो आहे.

म्हणून आजचा विषय असा आहे की ''माणसा, कृपा करून जागा हो!'' ही जागे होण्याची वेळ आहे. कधीच न करण्यापेक्षा, उशीराने केलेले चांगलं!

तुम्ही दिलेल्या वेळेबद्दल धन्यवाद.

***